संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# नोटा बदलल्या! नीती मात्र कायम

**या** महिन्यामध्ये नोटाबंदीच्या निर्णयाला सहा महिने पूर्ण होतील. आर्थिक वर्षाचा विचार केला तर एप्रिलपासून नवे आर्थिक वर्ष सुरू होईल. नोटाबंदीनंतरची सहा महिन्यांतली आर्थिक परिस्थिती असा जर विचार केला, तर या नोटाबंदीचे आणखी जे परिणाम अपेक्षित होते, ते अजून तरी दिसू लागलेले नाहीत. म्हणजेच नोटा बदलल्या आहेत. परंतु, सरकारची आणि समाजातल्या संपत्ती दडवणाऱ्या विशिष्ट वर्गाची नीती मात्र बदललेली नाही. पूर्वीसारखीच नीती किंवा प्रवृत्ती राहणार असेल, तर एवढ्या मोठ्या निर्णयाचा कोणताच मोठा परिणाम साधला गेला नाही, असाच निष्कर्ष काढावा लागेल. नोटाबंदीनंतर लोकांना काळा पैसा किती जमा झाला, याची नेमकी माहिती मिळेल, अशी अपेक्षा होती. ज्यांच्याकडून काळा पैसा वसूल झाला, त्यांच्यावर कठोर कारवाई होईल आणि सरकारकडे जमा झालेल्या काळ्या पैशाचा समाजातल्या गरीब वर्गासाठी उपयोग होईल, अशीही एक फार मोठी आशा सामान्य वर्गामध्ये होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटाबंदीमागची तीन महत्त्वाची कारणे सांगितली होती. एक म्हणजे काळा पैसा बाहेर काढणे, भ्रष्टाचार कमी करणे आणि दहशतवाद, नक्षलवादाला लगाम घालणे. परंतु, आज सहा महिन्यांनंतर या तीनही आघाड्यांवर फार काही लक्षणीय परिणाम दिसून आलेले नाहीत. फक्त राजकीय परिणाम भाजपाच्या बाजूने लागताना दिसत आहेत. परंतु, त्याचा सामान्य माणसाला थेट फायदा मिळण्याची शक्यता फार कमी आहे. आज काळ्या पैशाचे कोणतेच नेमके मोजमाप होऊ शकलेले नाही. नोटाबंदीमुळे काळा पैसा बाहेर आला, अशी जी काही आवई उठवली गेली ती कितपत खरी ठरली हे गुलदस्त्यातच राहिले आहे आणि या निर्णयानंतर काळा पैसा निर्माण होणे बंद होईल, असे जे वाक्य होते. तेही तितकेसे साध्य झालेले दिसत नाही. कारण भ्रष्टाचार, लाचखोरी किंवा राजकारण्यांची दलाली घेणे यामध्ये कोणताही मोठा फरक पाहायला मिळत नाही. याचा अर्थ जो व्यापक परिणाम नोटा बदलातून अपेक्षित होता, तो अद्याप साधला गेलेला नाही. म्हणजेच नोटा बदलल्या ही वस्तुस्थिती मान्य करताना त्याच्याबरोबरीने सरकारची आणि समाजातल्या विशिष्ट वर्गाची मानसिकता कायम राहिलेली आहे. पूर्वी जे व्यवहार जुन्या नोटांच्या माध्यमातून चालत होते, त्याची जागा आता नव्या नोटांनी घेतलेली दिसून येते. मग तो भ्रष्टाचार असेल, काळ्या पैशाची निर्मिती असेल किंवा दहशतवाद असेल. या तीनही गोष्टी पुन्हा हळुहळू पूर्वपदावर येत असल्याचेच पाहायला मिळत आहे.

### राजकारणातला पैसा आणि नोकरशाहीतला भ्रष्टाचार

भ्रष्टाचाराच्या बाबतीत तर लोकांचा मोठा भ्रमनिरास झालेला आहे. राजकारणातला प्रचंड पैसा हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण ठरते. निवडणुकांमध्ये होणाऱ्या खर्चात कोणतीही कपात झालेली दिसत नाही. उलट आधीपेक्षाही जास्त पैसा खर्च झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. मग राजकारणात हा पैसा आला कुठून. तर त्याचा स्त्रोत हा काळा पैसाच असतो, हे निर्विवादपणे सिध्द होते. सरकारी स्तरावरच्या भ्रष्टाचारात कपात झाल्याचा दावा केला जातो. परंतु, तेदेखील पूर्ण सत्य नाही. कारण जर सरकारी स्तरावरचा भ्रष्टाचार कमी झाला असेल, तर सगळ्या सरकारी नव्या प्रकल्पांच्या किमती किमान पंचवीस टक्क्यांनी खाली यायला हव्यात. कारण भ्रष्टाचारामुळेच सरकारी कंत्राटांच्या किंमती वाढत असतात. जवळपास दहा ते वीस टक्के रक्कम ही नोकरशहा, मंत्री, राजकारणी यांच्या खिशात जात असेल. परंतु, सरकारी कारभारामध्ये पारदर्शकता नसल्यामुळे या प्रकल्पांच्या किमती किंवा खर्च कमी होण्याऐवजी दुप्पट वेगाने वाढताना पाहायला मिळतो, याचे कारण या प्रकल्पांच्या खर्चाची किंमत ठरवणारी सरकारी मानसिकता अजूनही तशीच कायम आहे. म्हणजे याचे दुसरे उदाहरण असे सांगता येते की उच्चशिक्षित शास्त्रज्ञांनी तयार केलेल्या मंगळ यानाचा खर्च हा अतिशय कमी असू शकतो. कारण या शास्त्रज्ञांच्या प्रकल्प खर्चामध्ये सरकारी मानसिकतेला फारसे स्थान उरत नाही किंवा सरकारी हस्तक्षेपालाही फारसा वाव नसतो. परिणामी मंगळ यान असेल किंवा एकाच वेळी १०४ उपग्रह अवकाशात सोडण्याची मोहीम असेल, त्याच्या खर्चामध्ये वाढ होण्याऐवजी कपात होताना दिसून येते. पण याउलट परिस्थिती सरकारी पध्दतीने काढल्या जाणाऱ्या प्रकल्प खर्चात पाहायला मिळते. म्हणूनच नोटा बंदीनंतर भ्रष्टाचाराची मानसिकता कायम आहे. ही जोपर्यंत कायम आहे, तोपर्यंत काळा पैसा निर्मितीचा कारखाना चालू राहील आणि मग त्यातून पुढच्या अनेक गोष्टी तशाच चालू राहणार आहेत.

### नोटाबंदीचा सहामाही ताळेबंद

नरेंद्र मोदी यांना नोटाबंदीचे यशच मोजायचे असेल, तर त्यांनी सर्वप्रथम सरकारी कामकाजातील नीती बदलली पाहिजे. नोटाबंदीपूर्वी भारतीय राजकारणातले नेते काही प्रमाणात बदलले गेले. आतापर्यंत काँग्रेसी राज्यकारभाराचा प्रदीर्घ अनुभव भारतीय राजकारणाने घेतला. त्यांचीसुध्दा राज्यकारभार करण्याची एक मानसिकता ठरून गेली होती. ती तर इतकी घट्ट झाली होती की, भ्रष्टाचार हा एक शिष्टाचाराचा भाग असल्याचे गृहित धरले जात होते. अगदी महाराष्ट्राच्या अनेक प्रकल्पांच्या खर्चात कपात झालेली नाही. जलसंधारण प्रकल्पांमध्ये भ्रष्टाचार झाल्याची दवंडी याच भाजपाने पिटली होती. आता यातलेच काही प्रकल्प पूर्ण करताना त्या प्रकल्प खर्चामध्ये तब्बल वीस ते पंचवीस टक्क्याची वाढ सर्रासपणे होत आहे. ही वाढ म्हणजेच भ्रष्टाचाराचा दबदबा सरकारी पातळीवर तसाच कायम असल्याचे स्पष्ट होते. हीच परिस्थिती बनावट नोटांबाबत दिसू लागली आहे. पुन्हा नव्या बोगस नोटा बाजारात फिरायला लागल्या आहेत. काश्मीरमधला दहशतवाद, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगढ इथला नक्षलवाद तसाच स्थिरस्थावर होऊ लागलेला दिसू लागतो. बारा जवानांची नुकतीच झालेली हत्या हे नोटाबंदीनंतरचे नक्षलवादाने केलेले मोठे हत्याकांड ठरते. म्हणूनच नोटाबंदीचा सहामाही ताळेबंद मांडताना एकच निष्कर्ष निघतो, तो म्हणजे नोटा बदललेल्या आहेत. नीती मात्र बदललेली नाही.